सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२८४६/४७ comm.urban@gmail.com

**राज्यातील नागरी सहकारी बँकांनी सहकारी गृहनिर्माण संस्थांना कर्जपुरवठा करणेबाबत..**

जा.क्र.ना.बँका/१सअ/सह.गृह.संस्था/कर्जपुरवठा/२०२४/1919 दिनांक :२६/६/२०२४

## परिपत्रक

राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून संस्थेस विकसनासाठी विकास कामांसाठी / कर्ज मिळणेबाबत नागरी सहकारी बँकांकडे कर्ज मागणी करण्यात येते.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने राज्यातील गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या विकसनासाठी / विकास कामांसाठी कर्जपुरवठा करणेस परवानगी मिळावी, अशी मागणी राज्यातील नागरी सहकारी बँकांकडून होत आहे. नागरी सहकारी बँकांना, अन्य संस्थांना सभासद करून घेण्यास बँकींग विनियमन कायदा, 1949 अन्वये प्रतिबंध केलेला आहे. तथापि नागरी सहकारी बँकेने सहकारी गृहनिर्माण संस्थेस कर्जपुरवठा करणेसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेचे मास्टर सर्क्युलर **RBI**/2015-16/07/**DCBR.BPD(PCB)MC NO.**9/09.22.010 /2015-16, दि. 01/07/2015 अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

सबब, सदर प्रकरणी प्रचलित बँकींग विनियमन कायदा, 1949, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961, नागरी सहकारी बँकांचे आदर्श उपविधी आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे मास्टर सर्क्युलर **RBI**/2015-16/07/**DCBR.BPD(PCB)MC NO.**9/09.22.010/ 2015-16, दि. 01/07/2015 मधील तरतूदी विचारात विचारात घेऊन याबाबत आढावा घेऊन अहवाल सादर करणेबाबत या कार्यालयाचे स्तरावर अभ्यास समिती गठीत करण्यात आलेली होती.

सदर प्रकरणी अभ्यास समितीने उक्त नमूद कायदा,कानू मधील तरतूदींचा अभ्यास करून या कार्यालयास सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार राज्यातील नागरी सहकारी बँकांनी सहकारी गृहनिर्माण संस्थांना कर्ज पुरवठा करणेबाबत खालीलप्रमाणे विहीत अटी व शर्तीचे अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे-

**विहीत अटी व शती :-**

i. संबंधीत नागरी सहकारी बँकेने सहकारी गृहनिर्माण संस्थेस कर्जपुरवठा करणेसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेचे मास्टर सर्क्युलर **RBI**/2015-16/07/**DCBR.BPD(PCB)MC NO.**9/09.22.010 /2015-16, दि. 01/07/2015 मधील तरतुदीनुसार व सदर परिपत्रकातील सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे अटीस अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

ii. कोणत्याही परिस्थितीमध्ये असे कर्ज विनातारणी देण्यात येवू नये.

iii. कर्ज रक्कमेपोटी नागरी सहकारी बँकेने संबंधीत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मालमत्तेवर योग्य तो बोजा निर्माण करावा. याबाबत कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यात यावी.

iv. असे कर्ज देताना नागरी सहकारी बँकेच्या हिताच्या दृष्टीने सर्व खबरदारी घेण्यात यावी.

v. नागरी सहकारी बँक, संबंधीत सहकारी गृहनिर्माण संस्थांना करीत असलेल्या कर्जाची परतफेड सदर सहकारी गृहनिर्माण संस्थांना अन्य संस्थेने प्रकल्प उभारणीसाठी कर्ज दिल्यास त्या रक्कमेतून प्राधान्य क्रमाने करण्यात यावी.

vi. सहकारी गृहनिर्माण संस्थांना कर्ज मंजूरीचे वेळी एका प्रोजक्टवर दोनदा (**Double Financing**) कर्ज मंजूर व वितरण होणार नाही याची कटाक्षाने काळजी घ्यावी.

vii. सहकारी गृहनिर्माण संस्था स्तरावर कर्ज वितरण व सभासद वा इच्छुक खरेदीदार यांनी घेतलेले स्वतंत्र कर्ज अशा प्रकारे एकाच मालमत्तेवर दोनदा कर्ज मंजूर होण्याची शक्यता गृहीत धरून प्रचलित अधिनियम, नियम व रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया कडून याबाबत निर्गमित परिपत्रकातील तरतूदीनुसार कर्ज मंजूरीचे वेळी विशेष काळजी घेण्यात यावी.

viii. कर्ज मंजूर करताना प्रचलित अधिनियमातील तरतूदी व वेळोवेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया कडून याबाबत निर्गमित परिपत्रकीय सूचनांचे काटेकोर पालन करावे. यासाठी कर्ज अदा करताना आवश्यक त्या अटी शर्ती घालण्यात याव्यात. अटी/शर्तींचा नियमभंग करून असे कर्ज वाटप झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत नागरी सहकारी बँकेच्या संचालकांची वैयक्तीक व सामुदायिक राहील.

**(दिपक तावरे,** भा.प्र.से.)
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत :

1. अध्यक्ष, दि महाराष्ट्र स्टेट अर्बन को-ऑप.बँक्स फेडरेशन लि., 4था मजला, भारतीय क्रीडा मंदीर, नायगांव
वडाळा, मुंबई 400 031
2. अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट अर्बन को-ऑप.बँक्स असोसिएशन लि., मुंबई शिल्पीन सेंटर, फोर्ट,
मुंबई 400 032

त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी वरीलप्रमाणे सूचना आपले सभासद बँकांचे तात्काळ निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :**

1. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
2. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

त्यांनी वरीलप्रमाणे सूचना आपले कार्यक्षेत्रातील नागरी सहकारी बँकांचे निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

**प्रत सविनय सादर :**

मा.प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड, , -मुंबई-400 032